**हसीनाबेगम वि. रुकियाबी**

## <u>निशाणी क्र. २६ खाली आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ हिने तिच्या विरुध्द झालेला विना लेखी जबाब रद्दकरुन तीला लेखी जवाब दाखल करण्याची परवानगी मिळणेबाबत सादर केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी क्र. १ हिने असे कथन आहे की, ती वयोवृध्द असल्याने मागील तारखेस न्यायालयात हजर राहु शकली नाही. व त्यामुळे विहीत मुदतीमध्ये आपला जबाब अभिलेखावर दाखल करू शकली नाही. तसेच तिचे पुढे असेही कथन आहे की, सदरचा झालेला विलंब हा तिने हेतुपुरस्सर केलेला नसुन आज रोजी ती तिचा लेखी जबाब अभिलेखावर दाखल करण्यास तयार आहे. सबब, प्रतिवादी क्र. १ हिने अर्ज मंजुर होऊन तिचा लेखी जबाब अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०३. वादीचे वकील श्री. यु.व्ही. खारकर यांनी सदरच्या अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले की, प्रतिवादी क्र. १ हिने विहीत मुदतीमध्ये आपला जबाब दाखल केला नाही. व त्याकरीता प्रतिवादी क्र. १ हिला योग्य तो दंड आकारण्यात यावा व त्यांनी योग्य तो आदेश पारित करण्याची विनंती केली आहे.

०४. प्रतिवादी क्र. १ हिने प्रस्तुतच्या अर्जामध्ये ती वयोवृध्द असल्याने विहीत मुदतीमध्ये आपला लेखी जबाब अभिलेखावर दाखल करू शकली नाही असे कथन केले आहे. प्रतिवादी क्र. १ हि सदर दाव्यामध्ये स्वत:हुन दिनांक १२.०४.२०२३ रोजी हजर झालेली आहे. तसेच दिनांक २५.०७.२०२३ रोजी तिने विहीत मुदतीत आपला जबाब अभिलेखावर दाखल केलेला नसल्याने तिच्या विरूध्द विना लेखी जबाब आदेश निशाणी

क्र. १ वर पारीत करण्यात आला.

**०५.** सदर प्रकरणातील अभिलेख तपासले असता असे दिसुन येते की, सदरचा दावा हा सन २०२२ मध्ये दाखल करण्यात आलेला असुन दिनांक २५.०७.२०२३ रोजी प्रतिवादी क्र. १ हिच्या विरुध्द विना लेखी जबाब आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी क्र. १ हिने प्रस्तुतचा अर्ज हा तिच्या विरुध्द झालेला विना लेखी जवाब आदेश रद्द करुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. तसेच आज रोजी प्रतिवादी ही तिचा लेखी जवाब अभिलेखावर दाखल करण्यास तयार आहे. सदरचा दावा हा वादीने वाटणीकरीता व मालक व ताबेदार घोषीत करणे करीता दाखल केलेला असुन नैसर्गीक न्यायाच्या तत्वानुसार दोन्ही बाजु ऐकुण घेतल्यानंतर दावाचा निकाल देणे संयुक्तीक ठरेल त्याकरीता प्रतिवादी क्र. १ हिला अभिलेखावर आपले म्हणणे मांडु देण्याची एक संधी निश्चीतच देणे गरजेचे आहे. परंतु झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादीवर आर्थीक स्वरुपात दंड लावणे आवश्यक आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

**१.** अर्ज नि.क्र. २६ रक्कम २००/– रुपये खर्चासह मंजुर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादी क्र. १ हिच्या विरुध्द दिनांक २५.०७.२०२३ रोजी पारीत करण्यात आलेला विना लेखी जवाबाचा आदेश हा रद्द ठरविण्यात येतो व प्रतिवादी क्र. १ हिचा लेखी जवाब दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो व प्रस्तुत दाव्यात लेखी जवाब दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

**३.** प्रतिवादी क्र. १ हिने वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर वरील आदेश अंमलात येतील व तिला तिचा लेखी जवाब

दाखल करता येईल.

MANDAR MOHAN RAUT
Digitally signed by MANDAR MOHAN RAUT
Date: 2024.04.01 11:30:00 +0530

दिनांक २७.०३.२०२४.

(**मंदार मो. राऊत**)

दिवाणी न्यायाधीश क.स्तर

सेलू जि. परभणी